# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५१७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यलय, भंडारा
दिनांकः—१८/०८/२०१६

**१) टावर च्या केबल वायरची चोरी :—**

दिनांक ०८/०८/२०१६ ते १६/०८/२०१६ चे रात्र दर. यातील फिर्यादी रमा राय चौधरी वय ५० वर्ष रा. काटोल रोड नागपुर आरोपीने सुना मौका पाहुण गोसे मोबाईल टावरला लावलेली आर. एस. केबल वायर २४० मिटर लांबीचे कि. १०,०००/—रू. चा माल कापुन चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पाना. बिसने पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**२)क्षुल्लक कारणावरुन मारहाण केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक १६/०८/२०१६ रोजी १८.४५ वा. दर. यातील फिर्यादी गौतम दौलत वाघमारे वय ३५ वर्ष रा. सालेभाटा हा येथील बौध्द विहार कडे फिरण्यास गेला असता यातील आरोपी क्र. १ हा दिसल्याने तु १५ ऑगस्टच्या दिवशी ग्राम सभेला का आलास नाही. असे विचारले असता आरोपी क्र. १ ने तु बोलनारा कोन होतेस असे म्हणुन भांडन करून मारपीट करीत असतांनी आरोपी क्र. २ ते ४ हे सुध्दा संगनमत करून फिर्यादीच्या आई व वडीलास मारपीट करून फिर्यादीच्या डाव्या हातावर आरोपी क्र. १ ने एका लोखंडी वस्तुने डावे हातावर मारपीट करून फिर्यादीस भांडन व शिविगाळ करून मारण्या—पीटण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२४,५०४,५०६,३४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पठान पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**३)शासकीय कर्मचा—याला कर्तव्यावर हजर असतांना मारहाण . :—**

दिनांक १७/०८/२०१६ रोजी १०.२५ ते २०.०० वा. दर. यातील फिर्यादी पो. शि. हा पो. स्टे. तुमसर येथे शासकीय कर्तव्यावर हजर असतांनी यातील आरोपी आमदार हे पो.स्टे. तुमसर समोर आयोजीत भाजपा पक्षाचे तिरंगा रॅलीसभे करीता आले असतांना त्याचा खाजगी वाहन चालक हा सभे दरम्यान वारंवार रस्त्यावर येवुन सभेचे चित्रीकरण करुन वाहतुकीस अडथळा करीत असल्याने त्यास समजविण्यात आले असता तो पोलीसांनशी अरेरावीने वागत असल्याने त्या चालकाला पो.स्टे.तुमसरला आणण्यात आले असता त्यांचे समर्थकांनी त्याला समजावुन पो.स्टे. तुमसर मधुन घेवून गेले व सभा सपल्यानंतर आमदार हे आपले खाजगी चालका सोबत संगणमत करुन पो.स्टे.चे आवारात येवून फिर्यादी पो.शि.यांना तु माझे चालकाला का मारले असे जोरजोराने बोलुन फिर्यादीचे अंगावर चडून येवून फिर्यादीचे डावे गालावर हाताने थापड मारुन,हमला करुन फौजदारी पात्र बलप्रयोग केला. आरोपी हे भंडारा विधानसभा क्षेत्राचे आमदार श्री.रामचंद्र अवसरे व त्याचा खाजगी चालक तुलाराम सेलोकर यांचे विरुध्द फौजदारीपात्र गुन्हा दाखल होण्यास फिर्यादीने कायदेशिर रिपोर्ट दिल्याने फिर्यादी पो.शि.साठवने पो.स्टे.तुमसर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३५३,५०४,३४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. हावरे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

४) अवैध देशी दारु/जुगार अडयांवर धाडी. :-

दिनांक १८/०८/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. भंडारा,करडी,सिहोरा,गोबरवाही व साकोली येथील परीसरातील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०९ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४० लिटर हातभट्टी कि. २,२५०/-रु. व देशी दारू ०३ लिटर २४० मिली कि. ९०० चा माल तसेच जुगारातुन कि. ६,४७,१७७/-रु. चा असा एकुण कि. ६,५०,३२७/-रु. चा माल जप्त करण्यात आला.

( श्री.एस. टी. घुसर )
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह) भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५६१११९१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.